४५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोपुआ/ ९८८ /२०२३
दिनांक : २५/०४/२०२३

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड) सह कलम १२ अंतर्गत अंतिम आदेश)**

प्रस्तावना -

स.नं.१७३/३पैकी, सि.स.नं.४६६१/१, पांढारकर नगर, आकुर्डी येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम १२ अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(ड) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसुचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०५-११ जानेवारी २०२३, पान नं.२ वर आणि दि.२६/१२/२०२२ रोजीच्या लोकमंथन व दि.२७/१२/२०२२ रोजीच्या पुण्यनगरी या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली असून सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.१५/१२/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

(३) ज्याअर्थी, उपरोक्त पूर्वसूचनेतील नमूद ३० दिवसांच्या कालावधीत सदर क्षेत्रातील प्रत्येक झोपडी पाडून त्याखालील क्षेत्र मोकळे करून ती जागा विकसक यांच्या ताब्यात देण्यास फर्मावण्यात आले होते. त्याअर्थी, सदर योजनेमधील सर्व झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतींचे बांधकाम होईपर्यंत इतरत्र स्थलांतरीत केले असलेबाबत विकसक यांनी या कार्यालयास दि.०६/०३/२०२३ रोजी कळविले आहे, त्याचबरोबर सदर मिळकतीवरील झोपडीधारकांची तात्पुरत्या स्वरूपात राहण्याची व्यवस्था आमच्या जबाबदारीवर दरमहा भाडे देऊन करणार असलेबाबत रू.५०० च्या मुद्रांकावरील हमीपत्र दि.०७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयाकडे सादर केलेले आहे; आणि

(४) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या कार्यान्वयना संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अधिनियमातील कलम ३(ड) सह कलम १२ च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करण्यासंदर्भातील अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

१) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र घोषीत करण्यासंदर्भातील दि.१४/१२/२०२२ रोजीच्या पूर्वसूचना आदेशामधील सर्व शर्ती-अटी लागू राहतील या निर्देशासह सदर आदेश कायम करण्यात येत आहे.

२) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री

करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यास राहतील.

३) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास अशा प्रकरणी पात्रता धारण केलेली असली तरीही असा झोपडीधारक, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

४) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्रात कोणासही कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करता येणार नाही व अशी बाब निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता असे बांधकाम पाडणेत येईल.

५) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती अपराधसिध्दीनंतर उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

६) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचे कार्यालयात अपिल दाखल करणे शक्य आहे.

**झोपडपट्टीचे नाव :** स.नं.१७३/३पैकी, सि.स.नं.४६६१/१, पांढारकर नगर, आकुर्डी.
**महानगरपालिका क्षेत्र :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

अनुसूची

| स.नं./ सि.स.नं. | जमीन/भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमिती पध्दतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणीनुसार) | योजना क्षेत्राची चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१७३/३पै, सि.स.नं.४६६१/१ | एम.आय. डी.सी | २१००.०० चौ.मी. | लागू रस्ता स.नं.१७३पै व सि.स.नं. ४६६१पै | स.नं.१७३पै, सि.स.नं. ४६६१पै | स.नं.१७३पै , सि.स.नं. ४६६१पै. | लागू, सि.स.नं. ४४८७ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :**२८/०४/२०२३

२८.४.२३

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

कार्यवाहीस्तव प्रत -

१) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
२) मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
३) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - यांना माहितीस्तव सादर.
४) विकसक मे. साईगुरु कन्स्ट्रक्शन - यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर.